<u>प्रेसनोट</u>

दि.१९/०९/२०२२

## स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे कार्यालय येथील सहायक लेखा परीक्षा अधिका-यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | आळंदी पोलीस स्टेशन, गु.र.नं. २८४/२०२२<br>पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - महेश एकनाथ म्हात्रे, वय - ४२ वर्षे.<br>सहायक लेखा परीक्षा अधिकारी, वर्ग - २,<br>कार्यालय - स्थानिक निधी लेखापरीक्षा, पुणे. लेखा कोष भवन, पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- ( तीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३०,०००/- (तीस हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- १५/०९/२०२२
सापळा दिनांक :- १६/०९/२०२२
ठिकाण :- पी.सी.एस.चौक, आळंदी, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे ग्रामविकास अधिकारी असून ते पूर्वी कार्यरत असलेल्या खेड तालुक्यातील नानेकरवाडी ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण लोकसेवक म्हात्रे यानी केले आहे. तक्रारदारांचे नेमणुकीचे कालावधीतील कामकाजामध्ये आढळून आलेल्या त्रुटी / अनियमिततेसंबंधाने वसुलीचा रिपोर्ट न पाठविण्यासाठी लोकसेवक म्हात्रे यानी ३० हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक म्हात्रे यानी तक्रारदारांकडे लाचेची मागणी करून ३० हजार रूपये लाच रक्कम स्वीकारल्यावर रंगेहात ताब्यात घेण्यात आले असून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवक महेश म्हात्रे यास अटक करून मा. विशेष न्यायालय, खेड येथे दि.१७/०९/२०२२ रोजी हजर केले असता न्यायालयाने दि. १९/०९/२०२२ रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक भारत साळुंखे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.